महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्रं 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड-431601

# प्रेस नोट

दिनांक : 26.07.2025

## " मा.श्री.अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील कौतुकास्पद कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देवून केले सन्मानित.."

**मा.श्री अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक नांदेड** यांनी नांदेड, जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कामामध्ये उत्साह वाढावा व भविष्यात त्यांनी अधिक उत्तम कामगिरी करावी या उद्देशाने नांदेड जिल्हयातील कौतुकास्पद कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचा पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे आज दिनांक 26.07.2025 रोजी प्रशस्तीपत्र देवून सन्मान केला.

त्यामध्ये नांदेड जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस स्टेशन स्थरावर त्यांनी **बेस्ट डिटेक्शन, CCTNS DATA FEEDING,e-Sakshya,गुन्हे निर्गती, समन्स् बजावणी,वॉरंट बजावणी,** मध्ये कौतुकास्पद कामगिरी केली याबद्दल सन्मानित करण्यात आले त्यांची नावे खालील प्रमाणे.

### 1.बेस्ट डिटेक्शन :-

1) पो स्टे हिमायतनगर गु.र.नं. 122/2025 कलम 103 (1), 309 भारतीय न्याय संहिता 2023 मधील गुन्हयात 24 तासाच्या आत अज्ञात आरोपी निष्पन्न करुन आरोपी याने मयत महिला यांच्या अंगावरील सोन्याचे बळजबरीने चोरुन नेलेले दागिने व घरातील रोख रक्कम असा एकुण 2,74,000/- रु मुद्देमाल आरोपीकडून हस्तगत करुन 1) पोनि अमोल भगत 2) पोह/2401 नामदेव जाधव 3) पोह/2204 बालाजी पाटील 4) पोकॉ/527 चंद्रकांत अरकीलवार उत्कृष्ट कामगीरी केली.

2) पो स्टे वजिराबाद गु.र.नं.246/2025 कलम 309 (3), 3(5) भारतीय न्याय संहिता 2023 मधील गुन्हयातील 10.5 तोळे सोन्याचे दागिने एकुण 4,20,000/- रु माल चोरी गेला होता. गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून आरोपीस अटक करुन आरोपी कडून पुर्ण एकुण 4,20,000 रु मुद्देमाल हस्तगत करुन 1) पोनि परमेश्वर कदम 2) सपोनि राजु वटाणे 3)पोकॉ/3136 रमेश सुर्यवंशी 4) पोकॉ/2896 इम्रान शेख यांनी उत्कृष्ट कामगीरी केली.

**2)CCTNS DATA FEEDING :-** पो स्टे देगलूर यांनी CCTNS मध्ये 71 % डाटा एन्ट्रीफिड करुन 143 गुण मिळवुन 1) पोनि मारोती मुंडे, 2) ASI/5010 किरण कुलकर्णी, उत्कृष्ट कामगीरी केली. तसेच पो स्टे सोनखेड यांनी CCTNS मध्ये 72 % डाटा फिड करुन 144 गुण मिळवुन 1) सपोनि पांडूरंग माने 2) मपोकॉ/228 सुनिता हमपल्ले यांनी उत्कृष्ट कामगीरी केली.

**3)e-Sakshya :-** पो स्टे नांदेड (ग्रामीण) यांनी e-Sakshya App चा वापर करुन 708 SID Create करुन त्यापैकी 624 SID हया FIR सोबत Link करुन पोनि ओमकांत चिंचोलकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.तसेच पो स्टे माळाकोळी यांनी e-Sakshya App चा वापर करुन 54 SID Create करुन त्यापैकी 51 SID हया FIR सोबत Link करुन सपोनि महेश मुळीक यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**4)गुन्हे निर्गती :-** पो स्टे नांदेड ग्रामीण यांनी माहे जुन 2025 महिण्यात एकुण 162 गुन्हे निर्गती करुन पोनि ओमकांत चिंचोलकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच पो स्टे वजिराबाद यांनी माहे जुन 2025 महिण्यात एकुण 101 गुन्हे निर्गती करुन पोनि परमेश्वर कदम यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच पो स्टे उस्माननगर यांनी माहे जुन 2025 महिण्यात एकुण 58 गुन्हे निर्गती करुन सपोनि संजय निलपत्रेवार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**5)समन्स बजावणी :-** पो स्टे मुदखेड यांनी 142 समन्स बजावणी करुन बजावणीचे प्रमाण 93% ठेवून पोनि धीरज चव्हाण, पोह/402 त्रिंबक देशमुख यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.तसेच पो स्टे देगलूर यांनी 199 समन्स बजावणी करुन बजावणीचे प्रमाण 90% ठेवून पोनि मारोती मुंडे, पोह/610 चंद्रकांत भाग्यवंत यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच पो स्टे सोनखेड यांनी 82 समन्स बजावणी करुन बजावणीचे प्रमाण 98% ठेवून सपोनि पांडूरंग माने, पोकॉ/2850 दिगांबर कव्हाळे, पोकॉ/1428 गणेश सांजुरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच पो स्टे इस्लापुर यांनी 130 समन्स बजावणी करुन बजावणीचे प्रमाण 88% ठेवून सपोनि उमेश भोसले,पोकॉ/1013 गजानन नागरगोजे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.तसेच पो स्टे अर्धापुर यांनी 65 वॉरंट बजावणी करुन बजावणीचे प्रमाणे 87% ठेवून पोनि चंद्रशेखर कदम, सपोउपनि/5142 बालाजी कोकाटे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**6)वॉरंट बजावणी :-** पो स्टे कुंडलवाडी यांनी 17 वॉरंट बजावणी करुन बजावणीचे प्रमाणे 100 % ठेवून  सपोनि श्री. ज्ञानेश्वर शिंदे, पोकॉ/2704 मिर्झा फैयाज बेग यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच पो स्टे सिंदखेड यांनी 43 वॉरंट बजावणी करुन बजावणीचे प्रमाणे 78 % ठेवून सपोनि रमेश जाधवर, पोना/2723 रघुनाथ मडावी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**7)कौतुकास्पद कामगिरी :-** पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडे पाठपुरावा करुन व त्यांना मार्गदर्शन करुन आय गॉट कर्मयोगी ॲपव्दारे 100 टक्के अधिकारी व 97 टक्के अंमलदार यांचे आयगॉट कर्मयोगी ॲपवर नोंदणी व 05 प्रशिक्षण केलेले प्रमाणपत्र बाबत पुर्तता करुन घेउन सपोनि श्रीमती वर्षा डहाळे, पोह/1405 रंजित नरवाडे, मपोकॉ/2975 अमरीन शेख,मपोह/2632 गोदावरी कुंडगीर,पोकॉ/1222 ज्ञानेश्वर यन्नावार, पोकॉ/859 दिपक राठोड यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**मा.श्री.अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक नांदेड,** यांनी वर नमुद अधिकारी व अंमलदार यांना सन्मानित करून यापुढे हि भविष्यात चांगली कामगिरी करणे बाबत शुभेच्छा दिल्या आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड**